# आंबेडकरी कवयित्रींच्या काव्यातील 'मातृप्रतिमा'

**डॉ. अजय चिकाटे**
सहयोगी प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख
श्री पंढरीनाथ महाविद्यालय, नरखेड
जि. नागपूर, मो. ९८५०६९०७०४
ajaychikate2015@gmail.com

**सारांश :**

'प्रतिमांकितता' हे कवितेचे मुख्य लक्षण असून 'प्रतिमा' हा कवितेच्या भाषेचा महत्त्वाचा घटक असतो. 'इंद्रिय संवेदनात्मक अनुभूतीची शब्दचित्रे' प्रतिमांनी अंकित होतात शिवाय कवितेतील आशयाचा विस्तार आणि वाङ्मयीन घाटाला अधोरेखित करण्याचे कार्य प्रतिमा करीत असते. आंबेडकरी कवयित्रींच्या कवितेतील प्रतिमा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आंबेडकरी कवयित्रीने निर्माण केलेल्या 'मातृप्रतिमा' लक्षणीय आहेत. आंबेडकरी कवयित्रींनी स्वत:च्या आईशिवाय सावित्रीबाई फुले, रमाई आणि यशोधरा या मातृप्रतिमा रेखाटल्या आहेत. आंबेडकरी कवयित्री या तीन मातांना 'सांस्कृतिक माता' मानतात व त्यांचा आदर्श धारण करतात. या कवयित्री या तीन महान स्त्रियांना 'माउली' मानतात पण त्यांचे दैवीकरण करीत नाहीत. वस्तुनिष्ठ पातळीवरून या तीन मातांच्या जीवनाचा, विचारांचा आणि कर्तृत्वाचा धांडोळा घेतात. प्रचलित समाजव्यवस्थेकडून या तीनही स्त्रियांची अवहेलना झाली आहे, शिवाय स्वकियांकडूनही या तीनही मातांची उपेक्षा झाली आहे हे आंबेडकरी कवयित्री स्पष्टपणे नोंदवितात. या मातृप्रतिमांमधून दलित–आंबेडकरी जीवनाचे, दलित–आंबेडकरी स्त्रीचे आणि दलित–आंबेडकरी मानसिकतेचे पुरेसे प्रतिबिंब उमटले आहे. आंबेडकरी कवयित्रींनी रेखाटलेल्या मातृप्रतिमेतून भूतकाळाचा वेध घेणाऱ्या, वर्तमान वास्तवाचे भान ठेवणाऱ्या आणि भविष्याला जाणीवपूर्वक आकार देणाऱ्या आधुनिक स्त्रीची प्रतिमा साकार झाली आहे.

कविता ही प्रतिमांची बनलेली असते. कविमनातील किंवा कवींच्या जाणिवांतील गुंतागुंतीचा आणि तरल आशय शब्दबद्ध करण्यासाठी भाषेची व भाषेतील शब्दांची विशिष्ट जडणघडण कवीला करावी लागते. ती कवीची आणि कवितेचीही आंतरिक गरज असते. या गरजेतून प्रतिमांचा जन्म होतो. प्रतिमासृष्टी हा काव्याचा गाभाच म्हणता येईल. कारण मनात अनेक घटना–प्रसंगाच्या प्रतिमा उमटत असतात. कवी त्यांच्या मनातील अनुभव व्यक्त करण्याकरिता प्रतिमा वापरतात. प्रतिमेतूनच कविमनाचा अनुभव वाचकांपर्यंत पोहोचत असतो.

प्रतिमा हा कवितेच्या भाषेचा महत्त्वाचा घटक मानला जातो. प्रतिमा म्हणजे शब्दातून निर्माण होणारे चित्र. प्रतिमा म्हणजे मन:पटलावर उमटलेली इंद्रिय संवेदनेची प्रतिकृती असते. 'प्रतिमा' हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ साधर्म्य असा आहे. व्यवहारभाषेत प्रतिमा 'प्रतिबिंब' या अर्थाने तर शास्त्रभाषेत किंवा समीक्षेत प्रतिमा म्हणजे 'संवेदन अंगाचे दर्शन' असा अर्थ रूढ झालेला आहे. ''प्रतिमा म्हणजे शब्दांनी काढलेले चित्र, प्रत्येक काव्यात्म प्रतिमा ही काहीशी रूपकात्मक असते.''[१] अशी प्रतिमेची सुटसुटीत व्याख्या प्रसिद्ध इंग्रजी कवी–समीक्षक सी.डे. लेविस् यांनी केली आहे. ''प्रतिमा म्हणजे उच्चारांनी चिन्हांकित होणाऱ्या दोन किंवा अधिक मानसिक संदर्भांमध्ये म्हणजेच त्यातील संवेदनाकृती व तत्संलग्न भावनिक वैचारिक घटक यामध्ये घडणाऱ्या साधर्म्य वैधर्म्याधिष्ठित आंतरप्रक्रियेतून निर्माण होणारी मूर्त, गतिशील,

अनेकार्थी व सेंद्रीय संघटना.''[२] अशी डॉ. सुधीर रसाळ प्रतिमेची व्याख्या करतात. तर डॉ. वसंत आबाजी डहाके, ''कल्पनेच्या पातळीवर इंद्रिय गोचर होऊ शकणारा व जाणिवेने भारलेला कवितेचा प्राथमिक घटक म्हणजे प्रतिमा[३] अशी प्रतिमेची व्याख्या देतात. थोडक्यात 'इंद्रिय संवेदनात्मक अनुभूतींची शब्दचित्रे म्हणजे प्रतिमा' असा प्रतिमेचा अर्थ सर्वत्र रूढ झालेला आहे. विसदृश्य कल्पनांचा संयोग घडवून आणणे आणि भावनिक व्यामिश्र यथार्थ अभिव्यक्ती प्रतिमा करीत असते. संवेदनांचे संश्लेषण आणि आशयाचा विस्तार हे प्रतिमेचे अध्याहृत कार्य असते. इंद्रिय संवेद्यता, प्रसरणशीलता, रूपकात्मकता, सेंद्रियता आणि संघटन मूल्यात्मकता ही प्रतिमेची काही प्रमुख वैशिष्ट्ये मानली जातात. प्रतिमा भाषेला नवे रूप प्रदान करतात, कवीच्या भावना आणि विचारांचे योग्यप्रकारे वहन करतात, कविमनातील भावनांची, गुंतागुंतीची आंदोलने प्रतिमा वाचकांना प्रतीत करून देतात म्हणूनच साध्या शब्दांच्या तुलनेत प्रतिमा अधिक संदर्भसापेक्ष असतात, त्या मानवी जीवन व्यवहारातून अर्थवलये ग्रहण करीत असतात.

आंबेडकरी कवयित्रींचे प्रतिमा विश्व विविधांगी आहे. त्यांचे प्रतिमाविश्व त्यांच्या आंतरिक गरजेतून निर्माण झाले आहे. त्यांच्या कवितेतील सामाजिक आशय स्पष्ट होण्याकरिता आणि आशय प्रसरणशील होण्याकरिता या कवयित्री विशिष्ट प्रतिमांचा वापर करतात. या कवयित्रींच्या कवितेत बरेचदा प्रतिमा निवडीचे कार्य जाणीवपूर्वक होत असते. आंबेडकरी कवयित्रींच्या कवितेतून विद्रोह जाणिवांची अभिव्यक्ती होत असते. हा विद्रोह शोषण संदर्भांना तीव्र नकार देतो व त्याच वेळेस मानवतावादी मूल्यांचा स्वीकार करतो. या विद्रोहाला करुणेची कडा असते.

आंबेडकरी कवयित्रींच्या काव्यातील मातृप्रतिमा लक्षणीय आहेत. आई, माय हा विषय कोणत्याही कवी—कवयित्रीचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असतो. आंबेडकरी कवयित्री याला अपवाद नाही. पण या कवयित्रींनी स्वत:च्या आईशिवाय सावित्रीबाई फुले, रमाई आणि यशोधरा या तीन मातांचा आदर्श मानला आहे. या तीन महान व्यक्तिमत्त्व असलेल्या स्त्रियांना आंबेडकरी कवयित्री मातृस्थान देतात. या तीनही स्त्री व्यक्तिमत्त्वांबद्दलचे उल्लेख या कवयित्री अत्यंत आदरपूर्वक आणि कृतज्ञतापूर्वक करतात. या तीन स्त्रिया आंबेडकरी कवयित्रींच्या 'सांस्कृतिक माता' आहेत. स्वत:च्या आईपेक्षाही आंबेडकरी कवयित्री या तीन मातांना श्रेष्ठ मानतात. या तीन मातांच्या कार्याचा, त्यांच्या विचारांच्या, त्यांच्या त्यागाचा, त्यांच्या करुणेचा, त्यांच्यातील मानवतेचा आदर्श आंबेडकरी कवयित्री जपतात. प्रत्येक आंबेडकरी कवयित्रीने स्वत:च्या जन्मदात्या आईवर कविता लिहिली आहे पण त्याचबरोबर या तीन आदर्श मातांवर प्रत्येक कवयित्रीने किमान एक तरी कविता लिहिली आहे.

आंबेडकरी कवयित्रींच्या कवितेतील मातृप्रतिमा न्याहाळताना दिसते की आंबेडकरी आई कष्टाळू आहे. या आईच्या अंगावर झुळझुळणारे पातळ नाही जुनेर आहे पण त्याची त्यांना क्षिती नाही. या आयांना कष्टाच्या घामाचा वास चिकटला आहे. या आया तलम पातळे वापरत नाहीत. त्यांची ती आर्थिक कुवत नाही. गोठ पाटल्या घालत नाही, त्याचा त्यांना सोस नाही. गळ्यत पुतळ्यची माळ घालत नाहीत, आर्थिक विवंचनेमुळे त्यांना हे सारे शक्य नाही तरीही त्यांच्या मनात मायेचा झरा आहे. अकृत्रिम प्रेमाने त्या घामेजल्या अपत्यांचेही मुके घेतात. या आया आयुष्यातील कोणत्याही संकटाला धैर्याने तोंड देतात. फाटकाच पदर असला तरी अंगभर लपेटतात आणि त्यांच्या अब्रूवर वाकडी नजर जरी केली तरी त्यांना सहजपणे पायताणाने हाणतात. या आया परिस्थिती शरण नाहीत तर परिस्थितीचे आव्हान स्वीकारणाऱ्या

आहेत. अर्धपोटी राहतात पण फुकटचे खात नाही. पराकोटीने स्वाभिमान जपतात. परिस्थितीने त्या लाचार, अगतिक जरूर आहेत पण विचारांनी त्या लाचार नाहीत. दिखाऊपणाकरिता, बडेजावाकरिता कर्ज काढायचे नाही व कुणाचे गुलाम व्हायचे नाहीत असा सल्ला त्या मुलामुलींना देतात. प्रबोधनाच्या व अन्यायाविरुद्धच्या मोर्चात सहभागी व्हायला त्या आपल्या तरुण मुलामुलींना प्रवृत्त करतात. कौटुंबिक जबाबदारीचा भार हलका व्हावा म्हणून त्या नवऱ्याच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. या आया जिगरबाज आहेत. ''रखरखत्या उन्हात पावलं भाजीत/पोटची माया बाभळीला टांगून/रस्ता दुरुस्तीच्या कामावर डांबराचे पिपे वाहताना/चार कुडांच्या स्वप्नांसाठी भव्य इमारतींच्या चैलीवर गर्भार पावलं सांभाळून ठेवताना.''[४] अशी जिवावरची कामे त्या करतात. या आया गांजलेल्या जरूर आहेत पण विकाऊ नाहीत. भोवतीच्या कोलाहलात किंवा चमचमत्या दुनियेत त्या विरघळून जात नाहीत तर आपल्या अस्तित्वाचे सजग भान त्या ठेवतात.

आंबेडकरी आई अशिक्षित आहे पण अंधश्रद्ध नाही. या आया पुरत्या विज्ञाननिष्ठ आहेत. **''पोरी, त्या दगडाच्या देवा म्होरं/सारं आयुष्य वाहीलं/तरीबी त्याले पाझर फुटला न्हाही/त्या परीस माझं जातं बरं/ते कधीच चार दाण्यांशी बेईमान होत नाही.''**[५] शिक्षणाचे महत्त्व आंबेडकरी आई जाणते. पडतील ते कष्ट या आया उपसतात पण नव्या पिढीला शिक्षणापासून वंचित ठेवीत नाहीत. 'शिक्षण हेच प्रगतीचे दार' आहे हे त्यांना पुरते कळले आहे. डॉ. आंबेडकर हाच या स्त्रियांच्या आदर्श आहेत. 'आंबेडकरावानी शिकून मोठा होजो' असं त्या आपल्या मुलांना पदोपदी बजावतात. या आया दारिद्र्यत जगतात पण निराश नाहीत. त्या आशावादी आहेत. अंत:करणाचे औदार्य जपतात. दारिद्र्यातही काटकसरीने जपलेला पैसा मरताना दीक्षाभूमी स्मारकाला दान करणारी आई केवळ याच कवितेत आढळते. आंबेडकरी आई आयुष्यातला संघर्ष सांभाळून चळवळीतही कार्य करते. या आयांच्या डोळ्यत भविष्याची सुंदर स्वप्ने जपली जातात. पण वर्तमानाचे वास्तव त्या कधीही नजरेआड करीत नाहीत. त्या लाँगमार्चच्या मोर्चात, पिण्याच्या पाण्याच्या मोर्चात जातात. नामांतर चळवळीत पोलिसांचे दंडुके खातात आणि ताठ मानेने तुरुंगातही जातात.

संस्कार हे एक मूल्य आहे ते कसे रुजवायचे हे कदाचित या आया जाणत नाहीत पण त्यांच्या व्यवहारातून, विचारातून त्या 'माणुसकी' हे सर्वश्रेष्ठ मूल्य नव्या पिढीवर रुजवितात. त्या अंधश्रद्ध नाहीत. मुलाबाळांच्या दंडावर काळा किंवा कसलाच धागा बांधत नाहीत. त्यांच्या घरात दगडी देवांना थारा नाही. त्या उपास—तापास, नवस—सायास करीत नाहीत. कोणतेही कर्मकांड करीत नाहीत पण नव्या पिढीवर आंबेडकरी विचारांच्या मूल्यांचे बीजारोपण वा संस्कार आपल्या वागण्या—व्यवहारातून करतात. स्त्रीमुक्ती म्हणजे काय? स्त्रीवाद कसा असतो? हे सारे कदाचित त्यांना ठाऊक नाही पण त्या खऱ्या अर्थाने स्त्रीवाद जगतात. आंबेडकरी आई वत्सल आहे पण ती अकारण भावविव्हळ होत नाही. परिस्थितीवश तिला तिच्या मातृहृदयावर दगड ठेवून पोटापाण्यासाठी कष्ट करायला घराबाहेर जावे लागते पण त्याचा ती उगाच बाऊ करीत नाही किंवा त्रागा करीत नाही किंवा त्या विरुद्ध तोंडसुखही घेत नाही. ती मातृत्वाचा अकारण गौरव व उदात्तभाव जपत नाही. लेकरांकरिता अपार कष्ट त्या झेलतात पण त्याचे त्यांना कष्ट वाटत नाही. **''दीर्घकालीन अनाथ वणवण/तुझ्या काळ्या—सावळ्या चेहऱ्यावरची/आम्ही पाहिली निमूट मिटून आखखीच्या आख्वी माया आतड्याची/अवघं आयुष्य झालीस आमच्यासाठी माती, पाणी, उजेड वारा.''**[६] आपल्या मुलांच्या पंखात बळ भरण्याचे कार्य ती निमूटपणे करीत असते. उडत्या पक्ष्यांकडे बघणाऱ्या आपल्या मुलीला ही आई म्हणते, **''नको नको बये/उडत्या पाखराची पिकं मोजू नको/त्या परीस तूच**

**पाखरांचे पिकं लै/अन् मार भरारी समद्या गगनी''**[७] आंबेडकरी आई अशी कणखर पिढी तयारी करणारी आहे.

आंबेडकरी कवयित्री आपल्या आईपेक्षाही आपल्या 'सांस्कृतिक माता' सावित्रीबाई फुले, रमाई व यशोधरा यांना जास्त महत्त्व देतात, आदर्श मानतात. त्यांच्या चारित्र्याचे, कार्याचे, धैर्याचे, अंगीकृत कर्तृत्वाचे मोठेपण आपल्या काव्यातून चितारतात. सावित्रीबाई फुलेंबद्दल, **''परंपरेला धडक बैसली/छाती धडके सनातनी/दीपाला जणू स्नेह/तशी वीर धैर्यधारिणी''**[८] असा सार्थ गौरव व्यक्त करतात. **''झाल्या असतील चिंधड्या तुझ्या काळजाच्या/आम्हांस दुनियेच्या बरोबरीत आणताना/रुतले असतील काटेही अगणित/तरीही प्रगतीची वाट दाखवण्यासाठी/झुंजली असशील मर्दानी सारखी.''**[९] असा संवेदनभाव व्यक्त करतात. सावित्रीच्या कर्तृत्वाचे पुरते भान या कवयित्रींना आहे. तिच्यामुळेच भारतीय स्त्रियांना स्त्रीत्वाचे भान आले हे जाणूनच, **''सावित्री माझे आई/तू इथे जन्मली नसती/आणखी ही गे अबला/कुठे भटकली असती.''**[१०] असे भावनिक उद्‌गार काढतात. म. जोतीराव फुले यांनी सावित्रीला झुंजार बनविले हे खरे आहे मात्र सावित्रीबाई केवळ पतीची सावली म्हणून वावरल्या नाहीत. त्यांचे स्वत:चे अस्तित्व त्यांनी सिद्ध केले होते, **''सावली नव्हतीसच तू त्याची थेट/सावित्री तू म्हणजे स्त्रीचा पहिला विद्रोह/तू पहिली ठिणगी विद्रोहाची/बाईच्या धडधडत्या काळजातली.''**[११] सावित्रीने खूप भोगले, खूप सोसले, तिने दांभिकतेवर हल्ला मात्र केलाच केला. **''भोगलेस सारे विराट–विकलभोग/एका अर्वाचीन बाईचे/उघड केलेस डावपेच दांभिक कर्मविपाकाचे.''**[१२] सावित्रीमुळेच भारतीय स्त्रियांना वेगळं अवकाश प्राप्त झालं, आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी प्राप्त झाली. **''सावित्री माय तू फोडून टाकलास एकदाचा/तो सनातन मायावी आरसा/किंचाळत बाहेर आल्या/पटापट कितीतरी बाया/शोधू लागल्या पाळामुळांना/स्वत:ला तुकड्या–तुकड्यातून अखंडित.''**[१३] सावित्रीच्या आभाळाएवढ्या कार्याचे तेज आंबेडकरी कवयित्रीला खुणावते. आंबेडकरी कवयित्री सावित्रीपुढे नतमस्तक होते व तोच वसा पुढे नेण्याचा निर्धार करते.

'रमाई' या बाबासाहेबांच्या अर्धांगिणी. अपार कष्टाने त्यांनी बाबासाहेब या प्रज्ञावंत वादळाचा संसार सांभाळला. बाबासाहेबांचा अतिशय व्यस्त संसार या माउलीने न कुरकुरता सांभाळला. अत्यंत हालअपेष्टा सहन करीत, दारिद्र्यात, अर्धपोटी, शेण–गोवऱ्या वेचून, जुनेर घालून, पण स्वाभिमानाने त्यांनी संसाराला हातभार लावला. डॉ. आंबेडकरांच्या ज्ञानयज्ञात त्यांनी व्यत्यय येऊ दिला नाही. बाबासाहेबांना त्यांनी ज्ञानार्जनाकरिता व समाजसेवेकरिता पूर्णपणे मुक्त ठेवले. रमाई म्हणजे सोशिकतेचा महामेरू. महात्यागी रमाईचा आदर्श आंबेडकरी कवयित्री नजरेपुढे ठेवतात व त्यांना विनम्रपणे सामोरे जातात. **''शेणीच्या गोवऱ्या थापीत/फाटका संसार विणत होतीस.''**[१४] आणि **''हाडाची काडे झाल्यावरही तुझे दु:ख/तूच वाहिले/तुझ्या शीतल कुशीत/ज्वालामुखीला सांभाळलेस.''**[१५] आंबेडकरी कवयित्री रमाईच्या त्यागाचा व कर्तृत्वाचा दाखला देतात. रमाईच्या कष्टाकडे दुर्लक्ष करणारांना **''कर्तेपणाच्या ऐतिहासिक नोंदीत नाही येत तुझा संदर्भ/कुठेच/कधीच.''**[१६] अशी रमाईच्या कर्तेपणाची जाणीव करून देतात. रमाईचे वेगळे अस्तित्व अधोरेखित करताना, **''मला तू कधीच वाटली नाहीस/युगपुरुषाची फक्त सावली/तू स्वतंत्रपणे उभारलास/तुझा मूक विद्रोह/पारंपरिकतेतील अपारंपरिकता जाणून.''**[१७] रमाईच्या कष्टाची नोंद कवयित्री आतल्या कळवळ्याने घेते. **'मला लिहायच्यात तुझ्या खस्ता न् श्रम/तू थापलेल्या गोवऱ्या/संसारासाठी केलेली वणवण/एका साध्या–सुध्या बाईने गिळून टाकलेल्या रागालोभाचे/आकांक्षेचे स्वप्न भंगाचे कोरडेठाक आवंढे/तुझी नष्ट होत गेलेली झोप/खंगत चाललेला शरीर/मला लिहायचाय तुझ्या नसण्याचा काळोख.''**[१८] रमाई अशी आंबेडकरांच्या भावविश्वात विसावली आहे.

'यशोधरा' ही सिद्धार्थ गौतम बुद्धांची अर्धांगिणी. यशोधरेची व्यथा ही आंबेडकरी कवयित्रींना अत्यंत अस्वस्थ करणारी आहे. 'यशोधरेच्या निद्रिस्त पापण्यातील खोल डोह' किंवा 'यशोधरा जगत राहिली मातीच्या पावलांनी' सिद्धार्थाच्या पश्चात झालेली यशोधरेची अवस्था, **"ती समजावत राहिली अवघ्या शरीराला/मनाला... घट्ट अडसर घातला/तिने आयुष्यातल्या उजाड ऋतूंना."**[१९] सिद्धार्थ परत आल्यावर, **"उभा राहिलास तिच्यासमोर/असीम करुणेचे हात पसरून/देणार होती का यशोधरा तुझ्याकडून अव्हेरण्याची ठसठसती वेदना/रक्तातून जखडलेलं तुझं अस्तित्व/तुला दिसली का? सिद्धार्था/यशोधरेच्या डोळ्यतून निथळणारी अपार तृष्णा."**[२०] एक कवयित्री यशोधरेला एक जन्म व्याकूळ दु:ख संबोधते. यशोधरेचे विरही जीवन या कवयित्रींना व्यथित करते. **"बुद्धाच्या प्रकाशाने आम्ही उजळलो पण/तू मात्र अंधार पचवलास/जीवन काळं निळं होईस्तोवर/.. छिन्न जगून बेचिराख झालीस यशोधरे...!"**[२१] सिद्धार्थाचा संसार सांभाळणेही एक दिव्यच होते. **"एक सांग यशोधरे... इवल्या मुठीत कसे पेललेस ते अग्निबंबाळ तुफान?"**[२२] यशोधरेचा संसार त्यागून सिद्धार्थ फार मोठा झाला मात्र यशोधरेचा हंबर कुणाला ऐकू आलाच नाही. **"तो गेला/तो जिंकला/तो प्रकाशला/त्याच्या यशोगाथा ऐकताना तुझं स्त्रीत्व हंबरत असेल/पती नि पुत्र हरवलेली तू उन्मळली असशील केळीसारखी/पण इतिहासाने सांगितली नाही/तुझ्या त्यागाची महान कथा."**[२३] सिद्धार्थने मानवमुक्तीचा, मानवी कल्याणाच्या मार्ग सांगितला, पण लोकांना सत्य नाही चमत्कार हवे असतात म्हणून एक कवयित्री म्हणते, **"सिद्धार्थाने समाधीचे ढोंग रचले असते/तर महाकाव्य चितारली असती तुझ्यावरही/गाजली सीता—सावित्री सारखी/तुही पोथ्या पुराणातून."**[२४]

आंबेडकरी कवयित्रींच्या कवितेतील मातृप्रतिमा मराठी पारंपरिक कवितेतील आईपेक्षा वेगळ्य आहेत. पारंपरिक आई सुरक्षित चौकटीत वावरते. दलित—आंबेडकरी आई कष्टिक आहे. संघर्षशील आहे, समाजाभिमुख आहे. ती स्वभान जागे झालेली स्त्री आहे. पारंपरिक आई पुरुषी मानसिकतेला मूकपणे मान्य करते. दलित—आंबेडकरी आई मात्र अन्यायावर तुटून पडते. परखडपणे जाब विचारते. पारंपरिक आईची प्रतिमा वरवर सुखी दिसणारी, त्याग, दबलेल्या व्यथा—वेदना, कुटुंब वत्सल, मुला—बाळात रमणारी, संस्कारात गढून गेलेली, उपेक्षित पण उपेक्षांचं भान नसलेली आहे म्हणून मराठी कवयित्रींच्या आईच्या प्रतिमेचे चित्र परिवर्तनीय नाही. दलित—आंबेडकरी आईवर दैन्य, दास्य, होरपळ व अवहेलना या गोष्टी समाजव्यवस्थेने लादलेल्या आहेत. मात्र दलित—आंबेडकरी आई त्या सर्व गोष्टी प्रयत्नपूर्वक झुगारून विज्ञाननिष्ठ व मानुषमूल्यांचा स्वीकार करते.

आंबेडकरी कवयित्रींनी निर्माण केलेल्या 'मातृप्रतिमा' वास्तवावर आधारित आहेत. दलित आईचे, दलित मातेचे महत्त्व विशद करणाऱ्या, वेगळेपण अधोरेखित करणाऱ्या आहेत. आंबेडकरी कवयित्री ज्या तीन स्त्रियांना आदर्श मानते त्यांना माउलीचे स्थान देते पण महत्त्वाचे म्हणजे सावित्रीबाई फुले, रमाई आणि यशोधरा या तीन त्यागी स्त्रियांचे दैवीकरण करीत नाही. आंबेडकरी कवयित्री या माउलींच्या आयुष्याचा, त्यांचा विचारांचा मानुष पातळीवरून वेध घेतात. या तीनही स्त्रिया हाडामासाच्या चारचौघांसारख्या विचार—विकार धारण करणाऱ्या जिवंत व्यक्ती आहेत हे नोंदवते. संवेदनेच्या पातळीवरून या आदर्श स्त्रियांचा समाजव्यवस्थेकडून, संस्कृतीधार्जिण्यांकडून त्यांचेवर अन्याय तर झालाच, मात्र स्वकियांकडून सुद्धा त्यांची उपेक्षा झाली हे सुद्धा स्पष्टपणे नोंदवितात. सिद्धार्थ गौतमाला, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विहारात स्थान आहे. मात्र यशोधरा व रमाई यांना विहारात स्थान का नाही? असा प्रश्न आंबेडकरी कवयित्रींनी पडतो. आंबेडकरी कवयित्रींच्या मातृप्रतिमा दैवी नाहीत, मानवी आहेत. दलित जीवनाचे, दलित स्त्रीचे नेमके

शब्दांकन करणाऱ्या आहेत. दलित–आंबेडकरी आईची नेमकी प्रतिमा उजागर करणाऱ्या या प्रतिमा आहेत. या मातृप्रतिमेतून भूतकाळाचा वेध घेणाऱ्या, वर्तमान वास्तवाचे भान ठेवणाऱ्या आणि भविष्याला जाणीवपूर्वक आकार देणाऱ्या स्त्रीची प्रतिमा साकार झाली आहे.

**निष्कर्ष :**

१. आंबेडकरी कवयित्री स्वत:च्या आईशिवाय सावित्रीबाई फुले, रमाई आणि यशोधरा या तीन मातांचा आदर्श मानते.
२. सावित्रीबाई फुले, रमाई आणि यशोधरा या तीन स्त्रिया आंबेडकरी कवयित्रींच्या लेखी 'सांस्कृतिक माता' आहेत.
३. आंबेडकरी आई कष्टिक, स्वभान जागी झालेली, संघर्षशील आणि समाजाभिमुख आहे.
४. आंबेडकरी आई पुरेशी विज्ञाननिष्ठ असून समाजव्यवस्थेने लादलेल्या दैन्य, दास्य, होरपळ, उपेक्षा आणि अवहेलना या विरुद्ध सतत संघर्ष करते.
५. आंबेडकरी मातांनी अत्यंत विवेकाने मानुषमूल्यांचा स्वीकार करून आंबेडकरी विचारांचा बाणा जपून या विचारांचे संस्कार नव्या पिढीवर करण्याचा वसा घेतलेला आहे.
६. आंबेडकरी कवयित्रींनी निर्माण केलेल्या मातृप्रतिमा वास्तवदर्शी आहेत.
७. आंबेडकरी कवयित्री सावित्रीबाई फुले, रमाई आणि यशोधरा यांना माउलीचे स्थान देतात पण त्यांचे दैवीकरण करीत नाहीत.
८. या तीनही महान स्त्रियांचा आदर्श ठेवून वस्तुनिष्ठपणे त्यांच्या जीवनाचा, विचारांचा व कर्तृत्वाचा धांडोळा घेतात.
९. या तीन महान स्त्रियांनी आधुनिक समाज निर्मितीकरिता अपार कष्ट उपसले तरीही समाजव्यवस्था आणि स्वकियांकडून सुद्धा त्यांची उपेक्षा आणि अवहेलना झाली हे प्रकर्षाने नोंदवितात.
१०.सिद्धार्थ गौतम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विहारात स्थान आहे तर यशोधरा, रमाई यांना विहारात स्थान का नाही? असा प्रश्न आंबेडकरी कवयित्री उपस्थित करतात.
११.आंबेडकरी कवयित्रींच्या मातृप्रतिमा उदात्त जीवनमूल्यांनी प्रेरित झालेल्या, त्यागमयी आणि सर्वांना आदर्शवत ठराव्यात अशा आहेत.
१२.आंबेडकरी कवयित्रींनी रेखाटलेल्या मातृप्रतिमांमधून दलित–आंबेडकरी जीवनाचे, दलित–आंबेडकरी स्त्रीचे आणि दलित–आंबेडकरी मानसिकतेचे पुरेसे प्रतिबिंब उमटले आहे.
१३.या मातृप्रतिमेतून भूतकाळाचा वेध घेणाऱ्या, वर्तमान वास्तवाचे भान ठेवणाऱ्या आणि भविष्याला जाणीवपूर्वक आकार देणाऱ्या आधुनिक स्त्रीची प्रतिमा साकार झाली आहे.

**संदर्भ सूची :**

१. सी.डे. डेवीस, 'वाड्मयीन संज्ञा–संकल्पना कोश', संपा. प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके अन्य, जी.आर. भटकळ फाउंडेशन, मुंबई, २००१, पृ. १६४
२. सुधीर रसाळ, 'कविता आणि प्रतिमा', मौज प्रकाशन, मुंबई, दु.आ. २००२, पृ. १६४
३. वसंत आबाजी डहाके, 'वाड्मयीन संज्ञा–संकल्पना कोश', उ.नि., पृ. २६९
४. ज्योती लांजेवार, 'अजून वादळ उठले नाही', क्रांतीपर्व प्रकाशन, पुणे, २०००, पृ. ११
५. संध्या रंगारी, 'कवडसे', आनंद प्रकाशन, औरंगाबाद, पृ. २४
६. प्रज्ञा लोखंडे, 'उत्कट जीवघेण्या धगीवर', पृ. ८५
७. उषा किरण आत्राम, 'म्होरकी', गोंडवाना साहित्य परिषद, नागपूर, १९९७, पृ. ८५
८. सुगंधा शेंडे, 'अग्निशिखा', शीलन प्रकाशन, नागपूर, १९९८, पृ. १
९. कुसूम आलाम, 'रान आसवांचे तळे', कुसूम आलाम, आलापल्ली, १९९८, पृ. ६६

१०.कुसूम आलाम, ‘रान पाखराची माय’, हरिवंश प्रकाशन, गडचिरोली, २०००, पृ. ६०
११.प्रज्ञा लोखंडे, ‘मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा’, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २००७, पृ. ३
१२.तत्रैव
१३.तत्रैव, पृ. १५
१४.हिरा बनसोडे, ‘फिनिक्स’, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २००१, पृ. १६
१५.तत्रैव
१६.प्रज्ञा लोखंडे, ‘मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा’, उ.नि., पृ. ५२
१७.तत्रैव
१८.तत्रैव, पृ. ५३
१९.प्रज्ञा लोखंडे, ‘अंत:स्थ’, मानसन्मान प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. ३९
२०.तत्रैव, पृ. ४७
२१.हिरा बनसोडे, ‘फिर्याद’, उ.नि., पृ. ५
२२.तत्रैव
२३.तत्रैव, पृ. ६
२४.तत्रैव